—: प्रेसनोट :—　　　　　　　　दि. १८/०३/२०२१

**यातील फिर्यादी यांच्या मयत काकाच्या घरदुरुस्तीकरीता यांतील आलोसे यांनी रु. १५०००/— लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. १४०००/— स्विकारल्याने रंगेहात पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १५/२०२१ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १. श्री. अमोल अरविंद लोखंडे, वय २३ वर्षे, धंदा—नोकरी (कामगार) वर्ग—३<br>२. श्री. मदन हरीभाऊ नौबत, वय ३२ वर्षे, धंदा—नोकरी (कामगार) वर्ग—३<br>३. श्री. अविनाश प्रकाश इंगुळकर, वय ३१ वर्षे, धंदा—नोकरी (कनिष्ठ अभियंता)वर्ग—३<br>सर्व बृहन्मुंबई महानगर पालिका, एल विभाग, कुर्ला (पश्चिम), मुंबई—४०००७० |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १५,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १४,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांनी त्यांच्या मयत काकांचे कुर्ला परिसरातील घर दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेकरीता बृहन्मुंबई महानगर पालिका, एल विभाग, इमारत/कारखाने विभाग, कुर्ला, मुंबई येथील आलोसे क्र. २ यांची भेट घेतली होती. त्यावेळी आलोसे क्र. २ यांनी ते स्वत: घराचे ठिकाणी भेट देतील असे सांगितले. त्यानुसार आलोसे क्र. २ यांनी दिनांक १२/०३/२०२१ रोजी यांनी फिर्यादी यांच्या घरी भेट दिली. त्यानंतर आलोसे क्र. २ यांनी दिनांक १६/०३/२०२१ रोजी फिर्यादी यांना म.न.पा. एल विभाग कार्यालयात बोलावुन आलोसे क्र. २ यांनी आलोसे क्र. ३ यांची भेट घालुन दिली व त्यांचे वर नमुद घर दुरुस्तीकरीता प्रथम " जो चलता है वो दे दो, एक रुम का १५०००/— दे दो" असे म्हणून रु. १५०००/— लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १८/०३/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान फिर्यादी यांचेकडे आलोसे क्र. २ व ३ यांनी तडजोडीअंती रु. १४०००/— लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लावण्यात आलेल्या सापळा कारवाई वेळी आलोसे क्र. २ यांचे सांगण्यावरुन आलोसे क्र. १ याने फिर्यादी यांचेकडुन रु. १४०००/— लाच स्विकारतांना रंगेहात पकडल्याने गुन्हया नोंद करण्यात आला आहे. |

अपर पोलीस उप-आयुक्त सत्यमेव जयते बृहन्मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

१८/३

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net. टोलफि. क. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००